**नि.क्र.१३९ लगत**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा पुढील सरतपास सहा. सरकारी वकील श्री. जी. आर. माजगावकर यांचे मार्फत –**

**०४.** आता मला नि. १४२ वरील पंचनाम्यानुसार आरोपींच्या हस्ताक्षराच्या सहीचे नमुने घेतलेले सहा कागद एस १ ते एस ६ दाखविले. ते तेच आहेत. त्यावर आरोपीने केलेले हस्ताक्षर आहे व माझी, दुसरा पंच गंगाराम सावंत व पी.एस.आय सावंत यांच्या सहया आहेत. त्या सहा कागदांना एकूण **नि.१४४ ते १४९** देण्यात येते.

**०५.** त्यानंतर त्याच दिवशी पोलीसांनी माझे समक्ष आरोपी शेखर रामचंद्र नाईक याने ग्रामसेवक, गणेश मधुसुदन बागायतकर यांच्या केलेल्या बनावट सहयांचे नमुने निळया शाइच्या बॉलपेनने सहा सहया, सहा कागदावर घेतल्या व त्याबाबतचा पंचनामा माझे समक्ष करण्यात आला. त्यावेळी माझे सोबत दुसरे पंच म्हणून गंगाराम सावंत हे उपस्थीत होते. आता मला दिनांक ०१/०९/२००७ रोजीचा पंचनामा दाखविला. त्यावर माझी व दुसरे पंच गंगाराम सावंत व श्री.सावंत पोलीस यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.१५०** देण्यात येते.

**०६.** आता मला **नि.१५०** वरील पंचनाम्यानुसार आरोपींच्या हस्ताक्षराच्या सहीचे नमुने घेतलेले सहा कागद एस ७ ते एस १२ दाखविले. ते तेच आहेत. त्यावर आरोपीने केलेले हस्ताक्षर आहे व माझी, दुसरा पंच गंगाराम सावंत व पी.एस.आय. सावंत यांच्या सहया आहेत. त्या सहा कागदांना एकूण **नि.१५१ ते १५६** देण्यात येते.

**०७.** त्याच दिवशी पोलीसांनी माझे समक्ष आरोपी शेखर रामचंद्र नाईक याने सरपंच ग्रामपंचायत होडावडे, लक्ष्मी नारायण पार्सेकर यांच्या केलेल्या बनावट सहयांचे नमुने निळया शाइच्या बॉलपेनने सहा सहया, सहा कागदावर घेतल्या व त्याबाबतचा पंचनामा माझे समक्ष करण्यात आला. त्यावेळी माझे सोबत दुसरे पंच म्हणून गंगाराम

सावंत हे उपस्थीत होते. आता मला दिनांक ०१/०९/२००७ रोजीचा पंचनामा दाखविला. त्यावर माझी व दुसरे पंच गंगाराम सावंत व श्री.सावंत पोलीस यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.१५७** देण्यात येते.

०८. आता मला **नि.१५७** वरील पंचनाम्यानुसार आरोपींच्या हस्ताक्षराच्या सहीचे नमुने घेतलेले सहा कागद एस १३ ते एस १८ दाखविले. ते तेच आहेत. त्यावर आरोपीने केलेले हस्ताक्षर आहे व माझी, दुसरा पंच गंगाराम सावंत व पी.एस.आय. सावंत यांच्या सहया आहेत. त्या सहा कागदांना एकूण **नि.१५८ ते १६३** देण्यात येते.

०९. त्याच दिवशी पोलीसांनी माझे समक्ष आरोपी शेखर रामचंद्र नाईक याने सिकंदर यमनप्पा कोलकर यांच्या केलेल्या बनावट सहयांचे नमुने सहा कागदावर घेतले व त्याबाबतचा पंचनामा माझे समक्ष करण्यात आला. त्यावेळी माझे सोबत दुसरे पंच म्हणून गंगाराम सावंत हे उपस्थीत होते. आता मला दिनांक ०१/०९/२००७ रोजीचा पंचनामा दाखविला. त्यावर माझी व दुसरे पंच गंगाराम सावंत व श्री.सावंत पोलीस यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.१६४** देण्यात येते.

१०. आता मला **नि.१६४** वरील पंचनाम्यानुसार आरोपींच्या हस्ताक्षराच्या सहीचे नमुने घेतलेले सहा कागद एस १९ ते एस २४ दाखविले. ते तेच आहेत. त्यावर आरोपीने केलेल्या सहया आहेत व माझी, दुसरा पंच गंगाराम सावंत व पीएएस.आय सावंत यांच्या सहया आहेत. त्या सहा कागदांना एकूण **नि.१६५ ते १७०** देण्यात येते.

११. त्याच दिवशी पोलीसांनी माझे समक्ष आरोपी शेखर रामचंद्र नाईक याने अरुण सोनु गोसावी यांच्या सहा सहया, सहा कागदावर स्वखुशीने केल्या व त्याबाबतचा पंचनामा माझे समक्ष करण्यात आला. त्यावेळी माझे सोबत दुसरे पंच म्हणून गंगाराम सावंत हे उपस्थीत होते. आता मला दिनांक ०१/०९/२००७ रोजीचा पंचनामा दाखविला. त्यावर माझी व दुसरे पंच गंगाराम सावंत व श्री.सावंत पोलीस यांची सही

आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.१७१** देण्यात येते.

१२. आता मला **नि.१७१** वरील पंचनाम्यानुसार आरोपींच्या हस्ताक्षराच्या सहीचे नमुने घेतलेले सहा कागद एस २५ ते एस ३० दाखविले. ते तेच आहेत. त्यावर आरोपीने केलेल्या सहया आहेत व माझी, दुसरा पंच गंगाराम सावंत व पी.एस.आय. सावंत यांच्या सहया आहेत. त्या सहा कागदांना एकूण **नि.१७२ ते १७७** देण्यात येते.

१३. त्यानंतर त्याच दिवशी आरोपीने माझे उपस्थितीत पोलीसांसमक्ष पोलीस उपनिरीक्षक श्री. सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे निळया शाईच्या बॉलपेनने स्वखुशीने एकूण सहा कागदावर सहीचे नमुने दिले व त्याबाबतचा पंचनामा माझे समक्ष करण्यात आला. त्यावेळी माझे सोबत दुसरे पंच म्हणून गंगाराम सावंत हे उपस्थीत होते. आता मला दिनांक ०१/०९/२००७ रोजीचा पंचनामा दाखविला. त्यावर माझी व दुसरे पंच गंगाराम सावंत व श्री.सावंत पोलीस यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.१७८** देण्यात येते.

१४. आता मला **नि.१७८** वरील पंचनाम्यानुसार आरोपींच्या सहीचे नमुने घेतलेले सहा कागद एस ३१ ते एस ३६ दाखविले. ते तेच आहेत. त्यावर आरोपीने केलेल्या सहया आहेत व माझी, दुसरा पंच गंगाराम सावंत व पी.एस.आय. सावंत यांच्या सहया आहेत. त्या सहा कागदांना एकूण **नि.१७९ ते १८४** देण्यात येते.

१५. त्यानंतर त्याच दिवशी आरोपीने माझे उपस्थितीत पोलीसांसमक्ष पोलीस उपनिरीक्षक श्री. सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे निळया शाईच्या बॉलपेनने स्वखुशीने एकूण सहा कागदावर ० ते ९ असे मराठीत अंक लिहीले व त्याबाबतचा पंचनामा माझे समक्ष करण्यात आला. त्यावेळी माझे सोबत दुसरे पंच म्हणून गंगाराम सावंत हे उपस्थीत होते. आता मला दिनांक ०१/०९/२००७ रोजीचा पंचनामा दाखविला. त्यावर माझी व दुसरे पंच गंगाराम सावंत व श्री.सावंत पोलीस यांची सही आहे. त्यातील

मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.१८५** देण्यात येते.

१६. आता मला **नि.१८५** वरील पंचनाम्यानुसार आरोपीने लिहिलेल्या ० ते ९ असे अंक लिहिलेल्या सहा कागद एस ७३ ते एस ७८ दाखविले. ते तेच आहेत. त्यावर आरोपीने केलेल्या सहया आहेत व माझी, दुसरा पंच गंगाराम सावंत व पी.एस.आय. सावंत यांच्या सहया आहेत. त्या सहा कागदांना एकूण **नि.१८६ ते १९१** देण्यात येते.

१७. त्यानंतर त्याच दिवशी पोलीसांनी माझे समक्ष पोलीसांनी आरोपी शेखर रामचंद्र नाईक याचे सहा कागदावर हस्ताक्षर नमुने घेतले व त्याबाबतचा पंचनामा माझे समक्ष करण्यात आला. त्यावेळी माझे सोबत दुसरे पंच म्हणून गंगाराम सावंत हे उपस्थीत होते. आता मला दिनांक ०१/०९/२००७ रोजीचा पंचनामा दाखविला. त्यावर माझी व दुसरे पंच गंगाराम सावंत व श्री.सावंत पोलीस यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.१९२** देण्यात येते.

१८. त्यानंतर दिनांक ०२/०९/२००७ रोजी वेंगुर्ला पोलीसांनी मला पोलीसा ठाण्यात बोलावले. माझे सोबत दुसरा पंच म्हणून गंगाराम सावंत हे होते. आम्हा पंच व पोलीसांसमक्ष ग्रामसेवक गणेश मधुसुदन बागायतकर यांनी सरपंच, ग्रामपंचायत होडावडा व ग्रामसेवक, ग्रामपंचायत होडावडा पदाचे शिक्के हजर केले. त्या दोन्ही शिक्यांचे नमुने प्रत्येकी सहा कागदावर घेण्यात आले व त्या प्रत्येक कागदावर आम्हां पंचानी समक्ष म्हणून सहया केल्या. आता मला दिनांक ०२/०९/२००७ रोजीचा पंचनामा दाखविला. त्यावर माझी व दुसरे पंच गंगाराम सावंत व श्री.सावंत पोलीस यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.१९३** देण्यात येते.

१९. आता मला **नि.१९३** वरील पंचनाम्यानुसार ग्रामसेवक, ग्रामपंचायत होडावडा या पदाची शिक्के उमटविलेले एकूण सहा कागद एस ३७ ते एस ४२ दाखविले. ते तेच आहेत. त्यावर माझी, दुसरा पंच गंगाराम सावंत व पी.एस.आय. सावंत यांच्या

सहया आहेत. त्या सहा कागदांना एकूण **नि.१९४ ते १९९** देण्यात येते.

२०. आता मला **नि.१९३** वरील पंचनाम्यानुसार सरपंच, ग्रामपंचायत होडावडा या पदाची शिक्के उमटविलेले एकूण सहा कागद एस ४३ ते एस ४८ दाखविले. ते तेच आहेत. त्यावर माझी, दुसरा पंच गंगाराम सावंत व पी.एस.आय. सावंत यांच्या सहया आहेत. त्या सहा कागदांना एकूण **नि.२०० ते २०५** देण्यात येते.

२१. त्याच दिवशी पोलीसांनी आम्हा पंचासमक्ष ग्रामसेवक गणेश मधुसुदन बागायतकर यांनी सरपंच, ग्रामपंचायत होडावडा व ग्रामसेवक, ग्रामपंचायत होडावडा पदाचे शिक्के हजर केलेले शिक्के जप्त केले व त्याचा पंचनामा केला. आता मला दिनांक सदर  पंचनामा दाखविला. त्यावर माझी व दुसरे पंच गंगाराम सावंत व श्री.सावंत पोलीस यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.२०६** देण्यात येते. आता मला आमच्या समक्ष जप्त केलेले दोन्ही शिक्के दाखविले. ते तेच आहेत. त्यांना **आर्टीकल जी व आर्टीकल एच** देण्यात येते.

२२. त्यानंतर त्याच दिवशी पोलीसांनी तत्कालीन ग्रामसेवक गणेश बागायतकर, सरपंच लक्ष्मी नारायण पार्सेकर, सिंकदर यमनाप्पा कोलकर, अरुण सोनू गोसावी यांच्या सहयांचे नमुने माझे समक्ष वेगवेगळया सहा कागदावर घेतले व त्याबाबतचा पंचनामा माझे समक्ष करण्यात आला. त्यावेळी माझे सोबत दुसरे पंच म्हणून गंगाराम सावंत हे उपस्थीत होते. आता मला दिनांक ०२/०९/२००७ रोजीचा पंचनामा दाखविला. त्यावर माझी व दुसरे पंच गंगाराम सावंत व श्री.सावंत पोलीस यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.२०७** देण्यात येते.

२३. आता मला **नि.२०७** वरील पंचनाम्यानुसार ग्रामसेवक गणेश बागायतकर, सरपंच लक्ष्मी नारायण पार्सेकर, सिंकदर यमनाप्पा कोलकर, अरुण सोनू गोसावी यांच्या सहयांचे नमुने असलेले एकूण चोवीस कागद एस ४९ ते एस ७२ दाखविले. ते तेच आहेत. त्यावर चौघानी  केलेल्या सहया आहेत, तसेच माझी, दुसरे पंच गंगाराम सावंत

व पी.एस.आय सावंत यांच्या सहया आहेत. त्या चोवीस कागदांना एकूण **नि.२०८ ते २३१** देण्यात येते.

**२४.** त्याच दिवशी ग्रामसेवक बागायतकर यांनी आरोपी शेखर नाईक यांच्या हस्ताक्षरातील रजेचा अर्ज दिनांक ०२/०५/२००६ रोजीचा आणला होता. तो पोलीसांनी आमच्या समक्ष जप्त केला. आता मला सदरचा पंचनामा दाखविला, तो तोच आहे. त्यावर माझी, दुसरे पंचांची व पी.एस.आय सावंत यांच्या सहया आहेत. सदर पंचनाम्यास **नि.२३२** देण्यात येते. आता मला सदर जप्त केलेला कागद दाखविला. तो तोच आहे. त्यास **नि.२३३** देण्यात येते.

**जादा सरतपास पूर्ण.**

**फेरतपास** – नाही.

आरोपी व त्याचे वकील यांना वारंवार पुकारता गैरहजर असल्याने सदरची साक्ष त्यांच्या गैरहजेरीत नोंदविण्यात आली.

**आरोपी व तर्फे वकीलांचा वारंवार पुकारा करता गैरहजर. सबब उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by AVADHUT GAJANAN DESHINGKAR
Date: 2026.02.17 18:49:25 +0530

**( ए.जी.देशिंगकर )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग–ओरोस.

ठिकाण :– ओरोस
दिनांक :– १७/०२/२०२६.